महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## जाहिरात क्र. ०५/२०२३, जाहिरात क्र. ०६/२०२३, जाहिरात क्र. ०७/२०२३ व जाहिरात क्र. ०८/२०२३ करीताचे शुध्दीपत्रक

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीमध्ये सरळसेवा भरती अंतर्गत खालील नमूद पदे भरण्यासाठी दि. २९/१२/२०२३ रोजी कंपनीच्या संकेतस्थळावर जाहिराती प्रसिध्द करण्यात आल्या होत्या. तसेच याबाबत विविध वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्दी देण्यात आलेली होती.

| अनु.क्र. | जाहिरात क्रमांक | पदाचे नांव |
|---|---|---|
| १ | ०५/२०२३ | कनिष्ठ सहाय्यक (लेखा) |
| २ | ०६/२०२३ | विद्युत सहाय्यक |
| ३ | ०७/२०२३ | पदवीधर शिकाऊ अभियंता (वितरण)/(स्थापत्य) |
| ४ | ०८/२०२३ | पदविकाधारक शिकाऊ अभियंता (वितरण)/(स्थापत्य) |

ऑनलाईन अर्जाची नोंदणी करण्याकरीताची वेबलिंक (URL Link) कंपनीच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आली असून ऑनलाईन अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख २०/०३/२०२४ अशी दिलेली होती. तथापि, बहुतांश उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज सादर करण्याकरीता मुदतवाढ देणेबाबत विनंती केल्याने ऑनलाईन अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख २०/०५/२०२४ पर्यंत वाढविण्यात आली आहे.

दरम्यान, शासन निर्णय दि. २७/०२/२०२४ अन्वये सामाजिक व शैक्षणिक मागास वर्गाकरीता आरक्षणाची तरतूद लागू करण्यात येणार असल्यामुळे सदरच्या जाहिरातीमध्ये दिलेली आरक्षण वर्गवारी सद्यस्थितीत मागे घेण्यात येत आहे. नवीन सुधारीत बिंदूनामावलीप्रमाणे प्रवर्गनिहाय रिक्त पदांची माहिती प्रसिध्द करण्यात येईल व उमेदवारांना अर्ज करण्यासाठी पुरेसा अवधी देण्यात येईल. तसेच सदर भरती प्रक्रिया मा. उच्च न्यायालय मुंबई येथे रिट याचिका क्र. ३४६८/२०२४ व इतर याचिकाबाबत मा. न्यायालयाचा आदेश दि. १६/०४/२०२४ च्या अधीन राहून करण्यात येईल. ज्या उमेदवारांनी यापूर्वी अर्ज भरले आहेत त्यांनी पुनश्च: अर्ज भरण्याची आवश्यकता राहणार नाही. सुधारीत रिक्त पदे, URL Link इ. बाबतचे प्रसिध्दीपत्रक लवकरच कंपनीच्या www.mahadiscom.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल. उक्त पदाकरीता मूळ जाहिरातीमध्ये नमूद केलेले शैक्षणिक अर्हता, अटी व शर्ती इत्यादी अपरावर्तीत राहतील.

**सही/-**

**दिनांक : २६/०४/२०२४**

**सहाय्यक महाव्यवस्थापक (मासं)**